# प्रतिभा कॉलेजमध्ये ‘दीक्षारंभ – स्वागत सोहळा’ उत्साहात

## "सोशल मीडियाचा योग्य वापर करा व प्रवाहाबरोबर पुढे जाताना स्वतःचे मत जपा"

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी ‘दीक्षारंभ – स्वागत सोहळा 2026’ हा भव्य व प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात विद्यार्थी , पालक , शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारीच्या उपस्थितित उत्साहात संपन्न झाला.**



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी सुरुवात व्हावी, महाविद्यालयाची संस्कृती, शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, मूल्ये आणि भविष्यातील करिअरच्या संधी यांची विद्यार्थी व पालकांना ओळख व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाली. त्यानंतर प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या यशाचा व कार्याचा संपूर्ण आढावा सांगून नवोदित विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या पुणे विभागाच्या डेप्यूटी डायरेक्टर डॉ. ज्योती परिहार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना “सोशल मीडियाचा योग्य वापर करा व प्रवाहाबरोबर पुढे जाताना स्वतःचे मत जपा,” असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात महाराष्ट्र बोर्डाचे डायरेक्टर डॉ. महेश पालकर यांनी “अभ्यासातील चिकाटी वाढवा आणि नोकरीसाठी स्वतः संधी तयार करा,” असे सांगत दशावताराचा खरा अर्थ स्पष्ट करून त्याप्रमाणे स्वतःच्या अंगी गुण बाळगण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमानिमित्त वक्ते प्रा. विशाल शेवाळे, उद्योजक अभिमन्यू शांडिल्य, कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, संस्थेच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, एमबीएचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वनिता कुहाडे , प्रतिभा कॉलेजच्या प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ . जयश्री मुळे, प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती ही कार्यक्रमाची विशेष शोभा ठरली.

कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण ठरले ते ‘दशावतार’ या संकल्पनेवर आधारित भव्य सांस्कृतिक सादरीकरण. भगवान विष्णूंच्या दहा अवतारांची कथा विद्यार्थ्यांनी नृत्य, अभिनय, संगीत, निवेदन आणि प्रभावी दृश्यरचनेच्या माध्यमातून अत्यंत कलात्मक पद्धतीने सादर केली. मत्स्य ते कल्की या प्रवासातील प्रत्येक अवताराचे सादरीकरण प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे ठरले.

सुंदर वेशभूषा, प्रभावी नृत्यदिग्दर्शन, आकर्षक रंगमंच, कलात्मक प्रॉप्स, पार्श्वसंगीत आणि प्रकाशयोजना यामुळे संपूर्ण सादरीकरणाला भव्य रूप प्राप्त झाले. सरस्वती वंदना तसेच आसावरीच्या सुरेल गायनाने कार्यक्रमात आध्यात्मिक रंग भरला.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, आत्मविश्वास, शिस्त, समन्वय आणि उत्स्फूर्त सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. कोरिओग्राफर्स, सांस्कृतिक विभाग, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पडद्यामागे कार्यरत प्रत्येक सदस्याच्या अथक परिश्रमामुळे कार्यक्रमाला भव्य यश मिळाले.

### विद्यार्थ्यांना संस्कृतीशी जोडण्याचा प्रयत्न

कार्यक्रमानंतर पालकांनी “कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध, माहितीपूर्ण आणि प्रभावी होता. दशावताराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती आणि मुळांशी जोडण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला,” अशा भावना व्यक्त करत कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशाबद्दल कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक , सचिव डॉ. दीपक शहा यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. ते म्हणाले, “आजचा कार्यक्रम हा केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक प्रवासाची एक प्रेरणादायी सुरुवात होती. संपूर्ण प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या टीमने आज एक नवा मापदंड निर्माण केला आहे.”

# पुणे इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्यासोबत निर्माण होणारे सायबर धोके लक्षात घेऊन पुणे इंटरनॅशनल स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. क्विक हील फाउंडेशन यांच्या ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या अभियानांतर्गत आणि एमआयटी एसीएससी, आळंदी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.**




विद्यार्थ्यांना डिजिटल जगातील संभाव्य धोके समजावून सांगणे, ऑनलाइन खात्यांची सुरक्षितता वाढविणे आणि सुरक्षित व जबाबदार डिजिटल नागरिक घडविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. ‘माझा डेटा, माझी जबाबदारी’ या संदेशातून विद्यार्थ्यांना स्वतःच्या डिजिटल माहितीचे संरक्षण करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. सत्रामध्ये विद्यार्थ्यांना द्वि-घटक प्रमाणीकरण, डिजिटल पाऊलखुणा आणि सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. ऑनलाइन खात्यांची सुरक्षा वाढविण्यासाठी द्वि-घटक प्रमाणीकरणाचा वापर कसा करावा, इंटरनेटवर शेअर केलेली माहिती भविष्यात डिजिटल पाऊलखुणा म्हणून कशी राहू शकते आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर कसा टाळता येतो, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

विषय अधिक प्रभावीपणे समजण्यासाठी प्रत्यक्ष सायबर गुन्ह्यांवर आधारित प्रकरणांचा अभ्यास विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. या उदाहरणांद्वारे सायबर फसवणुकीच्या घटना कशा घडतात, त्यातील धोक्याची चिन्हे कशी ओळखायची आणि अशा घटनांपासून स्वतःचे संरक्षण कसे करायचे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या जनजागृती सत्राचे मार्गदर्शन एमआयटी एसीएससी, आळंदी येथील सायबर वॉरियर टीममधील ओम जेधे (सायबर वॉरियर), मधुरा भिलारे (सायबर वॉरियर) यांनी केले. संवादात्मक चर्चा, प्रकरणांचा अभ्यास आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घेण्यात आला. या उपक्रमास पुणे इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका मा. जयश्री कदम मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हा उपक्रम क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा मा. सौ. अनुपमा काटकर मॅडम यांच्या प्रेरणेतून आणि एमआयटी एसीएससी, आळंदीचे प्राध्यापक समन्वयक (फॅकल्टी कोऑर्डिनेटर) मा. श्री. अमित तळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांनी सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांचा सुरक्षित व जबाबदार वापर करण्याचा तसेच सायबर धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाय अंगीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. सुरक्षित डिजिटल भविष्यासाठी सजग नागरिक घडविणे हेच या उपक्रमाचे प्रमुख ध्येय आहे.